मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पालिकेला मिळाल्या पहिल्या महिला आयुक्त!

## दोन शालेय विद्यार्थ्यांनी बजावली आयुक्तांची भूमिका

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी ।** महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्तांची दिव्याची गाडी आली. गाडीचा दरवाजा उघडला आणि त्यातून महापालिका शाळेतील दोन विद्यार्थी उतरले. त्यांनी महापालिकेच्या मुख्य इमारतीत प्रवेश केला. मुख्य प्रवेशद्वार तसेच आयुक्त कार्यालयात तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना सॅल्युट केले. हे दृश्य होतं आज सोमवारी महापालिका आयुक्तांची भूमिका बजावणाऱ्या दोन शालेय विद्यार्थ्यांच्या स्वागताचे. त्यामध्ये एका मुलीचाही समावेश होता. महापालिकेला आतापर्यंत एकदाही महिला आयुक्त लाभल्या नाहीत. शिक्षक दिनानिमित्ताने महिला आयुक्त मिळाल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती. शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने सोमवारी वेगळा उपक्रम राबविला.



आयुक्त शेखर सिंह हे शिक्षक तर महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेतील इयत्ता ७ वी मधील विद्यार्थी करण काकडे आणि काळेवाडी येथील दत्तोबा रामचंद्र काळे शाळेतील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी अपेक्षा माळी या दोघांनी महापालिका आयुक्तांची भूमिका केली. यावेळी त्यांनी विभागप्रमुखांची आढावा बैठकदेखील घेऊन सूचना केल्या. बैठकीस सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते. यानंतर दोन्ही विद्यार्थी आयुक्तांनी संत तुकाराम नगर येथील अग्निशमन केंद्राला भेट देऊन तेथील कामकाज कसे चालते, अग्निशमन विभागाची जनतेला कशी मदत मिळते याबाबत प्रात्याक्षिक पाहिले, तसेच तेथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत चर्चा केली. एकीकडे विद्यार्थ्यांनी महापालिका आयुक्त म्हणून भूमिका केली तर दुसरीकडे आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिकेच्या शाळांमध्ये जाऊन शिक्षकाची भूमिका पार पाडली. या अनुभवाबाबत बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'जॉब स्विच' या उपक्रमाअंतर्गत मी आज एका शिक्षकाची भूमिका पार पाडली. तर, विद्यार्थ्यांनी माझ्या कार्यालयात जाऊन आयुक्तपदाची जबाबदारी पार पाडली. महापालिकेच्या इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेत शिकवत असताना मी चांद्रयानाबद्दल माहिती दिली. विद्यार्थी भविष्यात इस्रोचा एक भाग कसे बनू शकतात आणि वैमानिक अभियंता कसे होऊ शकतात याबद्दल त्यांनी मला प्रश्न विचारले. विशेषतः मुलींना हे करिअर स्वीकारण्याची आवड आहे हे पाहून मला आनंद वाटला. आकांक्षा शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी माझे शिक्षण, छंद, आवडते शिक्षक यांसारखे काही वैयक्तिक प्रश्न विचारले. त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देताना मला खूप आनंद झाला असे सांगून या अनुभवाने मलाही विचार करण्यासारखे काही प्रश्न जाणवले जेणेकरून शहरातील एकूण शिक्षण पद्धतीत काय बदल करता येतील याबाबत मला काही कल्पना सूचल्या आहेत.

### विविध शाळांचे शिक्षक उपस्थित

**» शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने सोमवारी वेगळा उपक्रम राबविला. आयुक्त शेखर सिंह हे शिक्षक तर महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेतील इयत्ता ७ वी मधील विद्यार्थी करण काकडे आणि काळेवाडी येथील दत्तोबा रामचंद्र काळे शाळेतील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी अपेक्षा माळी या दोघांनी महापालिका आयुक्तांची भूमिका केली. यावेळी त्यांनी विभागप्रमुखांची आढावा बैठकदेखील घेऊन सूचना केल्या. बैठकीस सहायक आयुक्त विजयकुमार थोरात, शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते.**

# पिंपरीकरांच्या नशिबी दिवसाआडच पाणी!

## धरण शंभर टक्के भरले; पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला

**पिंपरी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** समाधानकारक पाऊस न झाल्याने उन्हाळ्यात स्थिती कशी राहील? याबाबत प्रशासन सतर्क झाले आहे. पवना धरण भरले असले तरी शहरात दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. वर्षभर पिण्याचे पाणी पुरेल अशा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, नियमित पाणीपुरवठा कधी होणार याबाबत नागरिक प्रश्न करीत आहेत. पवना धरण शंभर टक्के भरले आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. मात्र, शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची अडचण होणार आहे. कारण पावसाने ओढ दिली आहे. संभाव्य पाणीटंचाईसाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. पाणीटंचाई आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणात शंभर टक्के पाणीसाठा आहे, तर पाऊसही गेल्या वर्षी एवढाच आहे. ग्रामीण भागात पावसाने ओढ दिल्यास



मावळातील ग्रामीण भागात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील विस्कळीत पाणीपुरठ्यामुळे शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. मोशी, चऱ्होली, दिघी, आळंदीरस्ता, चिखली, तळवडे, ताथवडे, किवळे, विकासनगर, वाकड परिसरात गृहनिर्माण सोसायट्यांना टँकरने पाणी घ्यावे लागत आहे. मावळ परिसरात समाधानकारक पाऊस झाला आहे. पावसाने आणखी ओढ दिल्यास पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. मात्र, पिण्याच्या पाण्याची समस्या नसेल, अशाा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

> “धरण भरले असतानाही गृहनिर्माण सोसायट्यांना पाणी पुरत नाही. त्यामुळे टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. सोसायट्यांना आर्थिक भार सोसावा लागत आहे. शहर परिसरातील सोसायट्यांना नियमित पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे.
>
> **-संजीवन सांगळे,**
> गृहनिर्माण सोसायटी असोसिएशन

> “दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असला तरी दिवसाला अर्ध्या शहरात ५४० एमएलडी पाणी पुरविले जात आहे. पाण्यात कपात केलेली नाही. पवना धरण भरले आहे. त्यामुळे वर्षभर पुरेल एवढे पाणी धरणात आहे.
>
> **-श्रीकांत सवणे,** सह शहर अभियंता

# आम्ही बाबरी पाडू शकतो ; तर पुण्येश्वराजवळील मस्जिद पाडूच शकतो

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची भीमगर्जना

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आम्ही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराजांचे अनुयायी आहोत. आम्ही अयोध्येतील बाबरी मशीद पाडू शकतो. तर पुण्येश्वराला अतिक्रमणातून मुक्त करण्यासाठी तिथे उभारलेली अनधिकृत मशीद पाडूच शकतो, अशी भीमगर्जना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे पुणे हे शहराचे नाव ज्यावरून पडले ते पुण्येश्वर मंदिर आणि या मंदिराच्या जागेवरील बेकायदा मस्जिद हटवण्यासाठी सकल हिंदू समाज बांधव आणि विविध संघटनांच्या वतीने पुणे महापालिका भवनासमोर




आज तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजपाचे आमदार महेश लांडगे, नितेश राणे, पुणे भाजपाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रखर हिंदुत्ववादी नेते डॉ. गजानन एकबोटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. आमदार लांडगे म्हणाले की, पुण्यात श्री. पुण्येश्वर मंदिराजवळील अनधिकृत मस्जिदीचे बांधकाम ४८ तासांत हटवा अन्यथा आम्ही हटवणार आहोत. पुणे शहराला ज्या मंदिराच्या नावावरुन ओळखले जाते. तो इतिहास कायम ठेवण्यासाठी आम्ही आता लढा सुरू केला आहे. पुण्येश्वराला अतिक्रमणातून मुक्त केले पाहिजे. न्यायालयाने या बांधकामाला स्थगिती दिली आहे. पण, प्रशासन कारवाई करीत नाही. प्रशासनाने जी मुळमुळीत भूमिका घेतली आहे.

### कोण आला रे कोण आला

» राज्याच्या विधानसभा सभागृहामध्ये समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्यासोबत आमदार महेश लांडगे यांची शब्दीक खडाजंगी झाली होती. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी लांडगे यांचा प्रखर हिंदूत्ववादी नेतो म्हणून समर्थन केले होते. आज झालेल्या आंदोलनात आमदार लांडगे यांनी भाषणाला सुरूवात करण्यापूर्वी हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरु केली. त्यामध्ये ''कोण आला रे कोण आला अबू आझमीचा बाप आला'' अशा प्रक्षोभक घोषणा देण्यात आल्या. आमदार लांडगे यांनी आक्रमकपणे भूमिका मांडली. पुण्याच्या कोंढवा, हडपसर भागात जर काही लोक घातक शस्त्र बाळगून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतील. तर आम्ही सुद्धा घरात घुसून मारल्याशिवाय गप्प बसणार नाही अशा इशाराही आमदार लांडगे यांनी दिला. त्यामुळे पुण्यात हिंदूत्ववादी संघटना आक्रमक झाल्याचे पहायला मिळत आहे.

# आता तृतीयपंथी फोडणार दहीहंडी!

## देशातील पहिल्या चार गोविंदा पथकांची पुणे-पिंपरीत स्थापना

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** दरवर्षी प्रमाणे यंदाही गोकुळाष्टमी हा सण देशभरात मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये साजरा करण्यासाठी सर्वजण सज्ज झाले आहेत. विशेषतः राज्यात गोविंदा पथकांची हा सण साजरा करण्यासाठी जय्यत तयारी सुरु झाली आहे, राज्यात विविध ठिकाणी थर रचण्याचा कसून सरावही सुरु झाला आहे. गेली काही वर्षे पुरुषांबरोबर महिला पथकही विविध शहरांमध्ये सहभागी होत असल्याचं चित्र आहे. आता या उत्सवात तृतीयपंथीयही सहभागी होणार आहेत. तृतीयपंथी यांचा सहभाग



असलेले १०० जणांचे तब्बल चार संघ हे पुणे शहर आणि पिंपरी चिंचवडमध्ये तयार करण्यात आले असून त्यांनी कसुन सरावालाही सुरुवात केली आहे. प्रत्येक संघात २५ तृतीयपंथीय सदस्यांचा सहभाग असणार आहे. येत्या सात सप्टेंबरला पुण्यातील नारायण पेठेतील गोगटे प्रशालेच्या मैदानावर सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास दहीहंडी फोडण्यात येणार आहे. 'दीपस्तंभ'चे विश्वस्त आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपक मानकर, सामाजिक कार्यकर्त्या शर्वरी गावंडे आणि शिवप्रताप संस्था यांच्या माध्यमांतून तृतीयपंथी यांच्या दहीहंडीचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक घटकाला जगण्याचा अधिकार आहे.त्याप्रमाणे तृतीयपंथी यांना देखील आहे. आज तृतीयपंथी विविध क्षेत्रात काम करताना दिसत आहे. ही चांगली बाब असून समाजाने त्यांना आपल्या कुटुंबातील व्यक्ती प्रमाणे स्वीकारले पाहिजे. त्या पार्श्वभूमीवर आम्ही यंदा प्रथमच तृतीयपंथी यांचे गोविंदा पथक तयार करण्याचा निर्णय घेतला आणि त्या कामाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. जवळपास १०० तृतीयपंथी एकत्रित आले असून आता हे सर्व सात सप्टेंबर रोजी दहीहंडी फोडण्यास सज्ज झाले आहे.यामधून समाजाला एक संदेश जाण्यास मदत होणार आहे अशी प्रतिक्रिया दीपक मानकर यांनी यावेळी दिली. यावेळी तृतीयपंथी कादंबरी म्हणाल्या की,आजपर्यंत आम्हा तृतीयपंथी यांना वेगळ्या नजरेने पाहिले जात होते.पण मागील काही महिन्यात आम्हाला सन्मानाची वागणूक मिळत आहे.हे पाहून आनंदाची गोष्ट वाटते. तसेच आता पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेने तृतीयपंथी यांना सुरक्षा रक्षक होण्याचा मान दिला.त्याबद्दल प्रशासनाचे आभार मानते आणि आम्हाला मुख्य प्रवाहात येण्यास यातून मदत झाली आहे. आजपर्यंत अनेक सण उत्सवांमध्ये आम्ही सहभागी होत नव्हतो. पण आता गोविंदा पथकात सहभागी होण्यास मिळत आहे. हे पाहून खूप छान वाटते आणि असे उपक्रम राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

### सर्वांना विशेष प्रशिक्षण

» समाजिक कार्यकर्त्यां शर्वरी गावंडे म्हणाल्या की, पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड शहरातील तृतीयपंथी यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहे. त्यापैकी एक तृतीयपंथी यांचा गोविंद पथक तयार करण्याचा निर्णय घेतला आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. याकरता सर्वांना विशेष प्रशिक्षण दिले गेले आहे असून या दहीहंडीची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डकडून देखील दखल घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अजित पवार सत्तेतून बाहेर पडा!

## मराठा आंदोलकांच्या घोषणांनी बारामती दुमदुमली

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** 'सरकारचा भरलाय घडा, अजित पवार सरकारच्या बाहेर पडा' अशा घोषणांनी आज मराठा आंदोलकांनी बारामती दणाणून सोडली. जालन्यामध्ये मराठा आंदोलकांवर पोलिसांनी लाठीमार केल्याच्या निषेधार्थ आज बारामतीत देखील कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. तसेच, मराठा संघटनांकडून मोर्चाही काढण्यात आला आहे. याचवेळी आंदोलकांनी अजित पवारांबाबत या घोषणा दिल्या. मराठा संघटनांनी आज पुकारलेल्या बंदला बारामतीतील व्यापा-यांनी पाठिंबा दिला आहे. त्यामुळे बारामतीमधील दुकाने व बाजारपेठ आज पूर्णपणे बंद आहे. सकल मराठा समाजाकडून आज सकाळी बारामतीच्या कसब्यातील श्री छत्रपती शिवाजी उद्यानापासून मोर्चा काढण्यात आला. गुनवडी चौक, गांधी चौक, सुभाष चौकमार्गे भिगवण चौकात मोर्चा येणार आहे. त्यानंतर सभा होणार असून विविध मान्यवर आपले विचार व्यक्त करणार आहेत. मराठा संघटनांकडून बारामतीमध्ये ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. काटेवाडी येथेही सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. योळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा घ्यावा, अन्यथा फडणवीस यांची साथ सोडावी, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली. जालना येथील घटनेला सर्वस्वी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जबाबदार असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. पोलिसांनी वरिष्ठांच्या आदेशाने हा लाठी हल्ला करत आंदोलकांना गंभीर जखमी केले, हे दुर्दैव आहे. महिलांसह लहान मुलांना देखील मारहाण करण्यात आली, हे संतापजनक आहे. आमचा पोलिसांवर रोष नाही, मात्र वरिष्ठांच्या आदेशाने हे कृत्य केले. मात्र त्यांना आदेश देणाऱ्या वरिष्ठांविषयी आमचा राग आहे, असे आंदोलक म्हणाले.



काटेवाडी येथे झालेल्या आंदोलनात आंदोलनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फुल्या मारलेले फोटो आंदोलकांनी झळकावले. मात्र यावेळी अजितदादांचा फोटो का नव्हता? अशी विचारणा केली असता आंदोलक म्हणाले, जालन्यातील घटनेला सर्वस्वी राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत. अजितदादांकडे आम्ही सकल मराठा समाज अपेक्षेने पाहत आहोत. त्यांनी फडणवीसांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाची माफी मागावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे. मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज करणाऱ्यांना मराठवाड्यात बंदी घाला असे आवाहनही राज ठाकरे यांनी केले आहे. सत्तेत असताना या विषयावर बोलायचे नाही, आणि विरोधात गेल्यावर मागणी करायची, असेच आजपर्यंत राजकारणी करत असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. राजकारणी लोकांच्या नादी लागू नका, असे आवाहन देखील राज ठाकरे यांनी केले आहे

### बारामतीची बाजारपेठ बंद..!

» मराठा संघटनांनी आज पुकारलेल्या बंदला बारामतीतील व्यापा-यांनी पाठिंबा दिला आहे. त्यामुळे बारामतीमधील दुकाने व बाजारपेठ आज पूर्णपणे बंद आहे. सकल मराठा समाजाकडून आज सकाळी बारामतीच्या कसब्यातील श्री छत्रपती शिवाजी उद्यानापासून मोर्चा काढण्यात आला. गुनवडी चौक, गांधी चौक, सुभाष चौकमार्गे भिगवण चौकात मोर्चा येणार आहे. त्यानंतर सभा होणार असून विविध मान्यवर आपले विचार व्यक्त करणार आहेत.

# आरएसएसची अखिल भारतीय समन्वयक बैठक यंदा पुण्यात!

## १४ ते १७ सप्टेंबर या काळात आयोजन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची दरवर्षी आयोजित केली जाणारी अखिल भारतीय समन्वयक बैठकीचे यंदा पुणे शहरात आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवसीय समन्वयक बैठक १४-१५-१६ सप्टेंबर २०२३ रोजी होईल. या बैठकीला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्यासह पाचही सहकार्यवाह व संघाचे अन्य प्रमुख उपस्थित राहतील. अशी माहितीसंघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. या बैठकीत ३६ संघप्रणित विविध संघटनांचे प्रमुख अधिकारी सहभागी होणार आहेत. ज्यामध्ये प्रमुख संघटना राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता पार्टी, भारतीय किसान संघ, विद्या भारती, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, सेवा भारती, संस्कृत भारती, अखिल भारतीय विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहतील. गेल्यावर्षी ही बैठक रायपूर येथे झाली होती. या




### संघप्रणित ३६ संघटना होतील सहभागी

» या बैठकीत ३६ संघप्रणित विविध संघटनांचे प्रमुख अधिकारी सहभागी होणार आहेत. ज्यामध्ये प्रमुख संघटना राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता पार्टी, भारतीय किसान संघ, विद्या भारती, भारतीय मजदूर संघ, संस्कार भारती, सेवा भारती, संस्कृत भारती, अखिल भारतीय विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहतील. गेल्यावर्षी ही बैठक रायपूर येथे झाली होती.

सभेत सहभागी होणाऱ्या सर्व संघटना समाजजीवनातील विविध पैलूंबाबत त्यांचे अनुभव व कार्य याबाबत सविस्तर चर्चा करणार आहेत. या बैठकीत सध्याच्या राष्ट्रीय परिस्थितीसोबतच सामाजिक समरसता, पर्यावरण, कौटुंबिक प्रबोधन, सेवा कार्य, सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षा या विविध विषयांवर विस्तृत चर्चा होणार आहे. सामाजिक बदलाच्या विविध क्षेत्रातील कारक कृतींवरही चर्चा केली जाईल.

# मावळसह लोणावळ्यात कडकडीत बंद!

## जालना लाठीमार प्रकरण; सरकारचा निषेध



### जागोजागी चोख बंदोबस्त

» लोणावळ्यात छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व मराठा समाज व इतर सर्व समाजाचे नागरिक, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, रिक्षा व टॅक्सी चालक-मालक एकत्र जमले होते. याठिकाणी सर्व मान्यवरांनी महाराष्ट्र शासनाचा व पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदविला. मुख्य म्हणजे मोठ्या संख्येने नागरिक या आंदोलनात सहभागी झाले. काही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा आंदोलकांवर जालन्यात पोलिसांकडून झालेल्या लाठीमार प्रकरणाचा निषेध नोंदविण्यासाठी लोणावळासह मावळ तालुक्यात सोमवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. तर, खेड तालुक्यात आळंदी मरकल रस्त्यावर आंदोलकांनी रस्त्यावर वाहनांचे टायर जाळ रास्ता रोको केल्याचा प्रकार घडला. दोन दिवसांपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी जालन्यात आंदोलन सुरू असताना पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचा निषेध नोंदविण्यासाठी व मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी लोणावळा शहर, कामशेत, वडगाव, तळेगाव, देहूरोड, पवनानगर या भागातील अत्यावश्यक सेवा व शाळा वगळता सर्व दुकाने, हॉटेल, रिक्षा, टॅक्सी, कंपन्या, भाजी मंडई असे सर्व व्यवहार सोमवारी बंद ठेवण्यात आले. तसेच शाळा महाविद्यालय यांना सुट्टी जाहीर करण्यात आली. मावळ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या या आंदोलनाला सर्वांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

मावळात या वेळी प्रथमच शहर व ग्रामीण भाग पूर्णपणे बंदमध्ये सहभागी झाला होता. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, याकरिता विविध समाजाचे नागरिक व नेते विभागवार निषेध मोर्चात सहभागी झाले होते. लोणावळ्यात छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व मराठा समाज व इतर सर्व समाजाचे नागरिक, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, रिक्षा व टॅक्सी चालक-मालक एकत्र जमले होते. याठिकाणी सर्व मान्यवरांनी महाराष्ट्र शासनाचा व पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदविला.

मुख्य म्हणजे मोठ्या संख्येने नागरिक या आंदोलनात सहभागी झाले. काही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मराठा समाजाने आजवर अनेक मूक मोर्चे काढत आरक्षणाची मागणी केली. जालन्यातदेखील शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू होते. मात्र या आंदोलनाच्या दरम्यान पोलिसांनी लाठचार्ज करीत आंदोलन मोडण्याचा प्रयत्न केला. समाजाचा अंत पाहण्याचा प्रयत्न करू नका, समाजाला तात्काळ आरक्षण द्या. पोलिसांना लाठीचार्ज कोणी करायला लावला, हे सर्व महाराष्ट्राला माहीत आहे. समाज पेटून उठला, तर महाराष्ट्रात भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते., याची दखल शासनाने घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

# कुरुलकर प्रकरणाची सुनावणी बंद खोलीत घेण्यास विरोध!

## कुरुलकरने दिलेली माहिती गोपनीय नसल्याचा दावा



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचा (डीआरडीओ) संचालक, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रेणा पाठविलेली माहिती गोपनीय नाही. संबंधित माहिती सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असा दावा डॉ. कुरुलकरचे वकील ॲड. ऋषिकेश गानू यांनी सोमवारी विशेष न्यायालयात केला. कुरुलकर प्रकरणाची सुनावणी बंद खोलीत (इन कॅमेरा) घेण्याबाबत राज्य दहशतवाद विरोधी पथकाने न्यायालयात सादर केलेल्या अर्जास ॲड. गानू यांनी युक्तीवादात विरोध दर्शविला. कुरुलकरने ब्रम्होस, रुस्तम, अग्नी, अशा क्षेपणास्त्रांची दिलेली गोपनीय माहिती अत्यंत संवेदनशील आहे. सुनावणी दरम्यान संबंधित माहिती प्रसारित झाल्यास देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचू शकते. त्यामुळे कुरुलकर प्रकरणाची सुनावणी बंद खोलीत (इन कॅमेरा) घेण्यात यावी, असा अर्ज राज्य दहशतवाद विरोधी पथकाकडून (एसआयटी) विशेष न्यायालयात सादर करण्यात आला. सरकार पक्षाकडून सरकारी वकील ॲड. विजय फरगडे यांनी विशेष न्यायाधीश एस. व्ही. कचरे यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सरकार पक्षाने दाखल केलेल्या अर्जास कुरुलकर यांचे वकील ॲड. गानू यांनी सोमवारी (४ सप्टेंबर) झालेल्या सुनावणीत विरोध केला. याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी (८ सप्टेंबर) होणार आहे. कुरुलकरची राज्य दहशतवाद विरोधी पथकाकडून (एटीएस) चौकशी करण्यात आली. तपासात मिळालेली माहिती तसेच एटीएसने न्यायालयात सादर केलेली कागदपत्रे मिळावीत, असा अर्ज बचाव पक्षाचे वकील ॲड. ऋषिकेश गानू यांनी सोमवारी न्यायालयात सादर केला. सरकारी वकील ॲड. विजय फरगडे यांनी बचाव पक्षाने सादर केलेल्या अर्जास विरोध केला. ॲड. फरगडे यांनी याबाबतचे लेखी म्हणणे न्यायालयात सादर केले. कुरुलकरच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरू आहे.

# पुण्यात चोरीच्या घटनात वाढ!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे शहरामध्ये मागील काही दिवसांमध्ये बसमध्ये सोनसाखळी चोरी आणि पाकीटमारीचे गुन्हे वाढत आहेत.अशाचप्रकारे पुणे - अहमदनगर रस्त्यावरील वाघोली येथील केसनंद फाटा याठिकाणी पीएमटी बस स्टॅन्ड येथून पुणे स्टेशनला जाणाऱ्या बस मध्ये चढत असताना, पाकीटमारी करताना एक महिला आणि पुरुष यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर प्रवाशांनी संबंधित महिलेस पकडले, मात्र तिचा साथीदार पळून गेला आहे. याप्रकरणी संबंधित आरोपींवर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. गौरी हरिया सलाट (वय -२०, राहणार -वाघोली ,पुणे) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी भीमराव श्रावण वाघमारे (वय -२७, रा. केसनंद ,पुणे) यांनी आरोपी विरोधात तक्रार दाखल केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार भीमराव वाघमारे त्यांची पत्नी मनीषा व सासरे तुळशीराम घाटे असे वाघोली ते पुणे स्टेशनला जाणाऱ्या बस मध्ये चढत होते. त्यावेळी एक अनोळखी पुरुष व संबंधित आरोपी महिला यांनी तक्रारदार यांच्या पाठीमागील उजव्या बाजूच्या खिशामध्ये हात घातला. मात्र, ही बाब तक्रारदार यांना जाणवली असता, त्यांनी लगेच त्या इसमाचा हात धरला असता, त्याच्या सोबतच्या महिलेने तक्रारदार यांना जोरात ठोशाबुक्क्याने मारहाण केली.त्यामुळे तक्रारदार यांची पत्नी मनीषा ही मध्ये पडली असता, तिला झटका देऊन तक्रारदार यांच्या खिशातील दोन हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून ओढत दोघे तिथून पळून जात होते.